दैनिक मराठवाडा पत्र



# जनगणना प्रशिक्षण; तीन हजारांहून अधिक मनुष्यबळ सज्ज

**परभणी । प्रतिनिधी**

आगामी जनगणना २०२७ च्या पार्श्वभूमीवर क्षेत्रीय प्रशिक्षकांचे प्रशिक्षण शिबिर जिल्हाधिकारी कार्यालयातील डीपीडीसी हॉल येथे घेण्यात आले. जनगणना प्रक्रियेसाठी तीन हजारांहून अधिक मनुष्यबळाची आवश्यकता भासणार असून, त्यानुसार नियुक्त्या करून प्रशिक्षण सत्रे सुरू करण्यात आली आहेत. दरम्यान, जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी नागरिकांनी जनगणना प्रक्रियेस सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. जनगणना संचालनालय, महाराष्ट्र व जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने क्षेत्रीय प्रशिक्षकांच्या पहिल्या बॅचचे तीन दिवसीय प्रशिक्षण शिबिर ६ एप्रिलपासून घेण्यात आले. या वेळी निवासी उपजिल्हाधिकारी



तथा जिल्हा जनगणना अधिकारी अनुराधा ढालकरी, नायब तहसीलदार तथा मास्टर ट्रेनर डॉ. राजकुमार राठोड, नगरसचिव मनपा परभणी तथा मास्टर ट्रेनर विकास रत्नपारखे, सहाय्यक महसूल अधिकारी तथा जिल्हा जनगणना लिपीक अलताफ मिया उपस्थित होते.

प्रशिक्षणाचा भाग म्हणून ८ एप्रिल रोजी मास्टर ट्रेनर डॉ. राजकुमार राठोड, विकास रत्नपारखे व अलताफ मिया यांनी ३२ क्षेत्रीय प्रशिक्षकांना प्रत्यक्ष फिल्ड व्हिजिटद्वारे आरआर पेट्रोल पंप परिसरात घरगणनेचे प्रात्यक्षिक करून दाखविले. प्रशिक्षणानंतर क्षेत्रीय प्रशिक्षक तालुका स्तरावर प्रगणक व पर्यवेक्षकांना मार्गदर्शन करणार आहेत. तालुका प्रशिक्षण सत्रे २७ एप्रिल ते ८ मे २०२६ दरम्यान आयोजित करण्यात येणार आहेत. जिल्ह्यातील सर्व तालुके, नगरपरिषद व नगरपंचायत क्षेत्रांसाठी २,७२७ प्रगणक व ४७१ पर्यवेक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## थोडक्यात...

### महापुरुषांच्या विचारांचा रंगोत्सव



**बीड । प्रतिनिधी**

महापुरुष चित्रकला स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त आणि अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला.या स्पर्धेतून विद्यार्थ्यांनी केवळ रंगरेषांमध्ये चित्रे रेखाटली नाहीत, तर महापुरुषांच्या विचारांचे जिवंत प्रतिबिंब साकारले. बीड शहरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्ताने जयभीम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे.त्याअनुषंगाने बुधवारी (दि.८) रोजी महापुरुष चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जी.के.जाधव उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून गजानन चित्रे, अनिल डोळस, गौतम सोनवणे, डी. जी. वानखेडे, परिक्षक विशाल गायकवाड, संपादक विनोद शिंदे यांनी उपस्थिती दर्शवून विद्यार्थ्यांचे कौतुक केले व मार्गदर्शन केले. महापुरुषांच्या महान व्यक्तिमत्त्वांचे प्रभावी चित्रण करताना विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला आणि सामाजिक जाणिवेला विशेष उंची मिळाल्याचे दिसून आले. प्रत्येक चित्रामागे एक विचार, एक प्रेरणा आणि एक संदेश दडलेला होता.या उपक्रमामागचा उद्देश विद्यार्थ्यांच्या मनात महापुरुषांविषयी आदर, कृतज्ञता आणि त्यांच्या विचारांचे संस्कार रुजवणे हा असून, स्पर्धेच्या माध्यमातून नव्या पिढीला प्रेरणेचा ठेवा देण्याचा प्रयत्न करण्यात आला.या स्पर्धेत संघवी जोगदंड (प्रथम), ज्योत्सना विद्यागर (द्वितीय), उमंग विद्यागर (तृतीय), समिक्षा सोनवणे (उत्तेजनार्थ), प्रियांश ससाणे (उत्तेजनार्थ), पौर्णिमा तांगडे (उत्तेजनार्थ) यांनी क्रमांक पटकाविला. या चित्रकला स्पर्धे चे प्रास्ताविक ड.तेजस वडमारे यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन ड.राजेश शिंदे, प्रा.पांडुरंग सुतार यांनी प्रभावीपणे पार पाडले, तर आभार प्रदर्शन तानाजी शिनगारे यांनी केले.स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती प्रमुख सुमेध जोगदंड व पदाधिकाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली.

### भिमा तुझ्या विद्वत्तेने जीवनाचे सोने झाले



**बीड । प्रतिनिधी**

बीड येथे आयोजित जयभीम महोत्सवात ख्यातनाम गायक चेतन चोपडे यांच्या संगीत रजनी कार्यक्रमाने आंबेडकर चळवळीचा विचार आणि प्रेरणा अतिशय प्रभावीपणे जनमानसात पोहोचवली. बा भिमा तुझ्या विद्वत्तेने आमच्या जीवनाचे सोने झाले, असे म्हणत या कार्यक्रमातून खऱ्या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समता, स्वातंत्र्य आणि बंधुतेच्या मूल्यांचा जागर झाला. बीड शहरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्ताने दि.५ ते १४ कालावधीत जयभीम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने मंगळवारी (दि.७) रोजी ख्यातनाम गायक चेतन चोपडे यांचा संगीत रजनीचा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा कृषी अधीक्षक सुभाष साळवे उपस्थित होते. या संगीत रजनी कार्यक्रमात गायक चेतन चोपडे यांनी आपल्या सुरेल आणि ओजस्वी आवाजातून बाबासाहेबांच्या संघर्षमय जीवनावर आधारित तसेच सामाजिक न्यायाचा संदेश देणारी भीमगीते सादर केली. प्रत्येक गीतातून अन्यायाविरोधातील लढा, स्वाभिमान आणि परिवर्तनाची हाक स्पष्टपणे उमटत होती. उपस्थित नागरिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात आणि जयभीमच्या घोषणांमध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद देत कार्यक्रमाला उत्साहाची उंची गाठून दिली. या संगीत रजनीने आंबेडकरी चळवळीच्या विचारांची पेरणी केली. तरुण पिढीला आपल्या इतिहासाची आणि संघर्षाची जाणीव करून देत सामाजिक बांधिलकीची प्रेरणा दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.प्रेमचंद सिरसाट यांनी तर सूत्रसंचालन प्रसिद्ध निवेदक महादेव इनकर, आणि विश्वमाला इनकर यांनी केले. आभार अभिजित जाधव यांनी मानले. भव्य संगीत रजनीचा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती बीड शहर यांनी मोलाचे योगदान दिले.

### बीड तालुका काँग्रेसची शुक्रवारी महत्त्वपुर्ण बैठक



**मोठ्या संख्येने उपस्थित रहा – गणेश बजगुडे पाटील**

**बीड । प्रतिनिधी**

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या आदेशाने सुरु असलेल्या संघटन सृजन अभियान अंतर्गत बीड तालुका काँग्रेस कमिटीची बैठक दिनांक १० एप्रिल २०२६ रोजी दुपारी ११ वाजता शासकीय विश्रामगृह बीड याठिकाणी होत असुन याबैठकीस अखिल भारतीय काँग्रेस पक्षाच्या वतीने बीड जिल्हा निरीक्षक श्रीमती नितु वर्मा मॅडम (नवी दिल्ली) याप्रमुख मार्गदर्शन करणार आहेत. त्याच बरोबर संघटन निरीक्षक माजी आमदार एम एम शेख, महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस सुरेंद्रजी घोडजकर, प्रदेश सरचिटणीस श्रीमती विद्याताई पाटील, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राहुल भैया सोनवणे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तरी बीड तालुक्यातील सर्व पदाधिकारी कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन तालुकाध्यक्ष गणेश दादा बजगुडे पाटील यांनी केले आहे.

# अतिवृष्टी नुकसानातून अनेक गावे वगळली : राजेंद्र आमटे, राजेंद्र वीर

## शेतकऱ्याची उभी पीक जमिनीवर लोळली, बागा मोडल्या तरी अहवाल का नाही ?

**बीड । प्रतिनिधी**

तालुकाच नव्हे तरी संपूर्ण जिल्हाभर अवकाळी अतिवृष्टीमुळे व गारपिटीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झालेले आहे. शेतकऱ्याच्या शेतातील उभं पिक काढणीला आला असताना अवकाळी मुळे वाया गेले असून ही या अतिवृष्टीतून अनेक गावांना वगळण्यात आले आहे. या गावांचा समावेश करून मदतीची तरतूद करावी अशी मागणी जिल्हाधिकारी यांना दिलेले निवेदनात शेतकरी पुत्रांच्या वतीने करण्यात आली. शेतकऱ्यांच्या शेतात उभा असणारा गहू ज्वारी बाजरी हरभरा करडई



ही पिके पूर्णतः भुईसपाट झाली आहेत तरीही अनेक मंडळातून अधिकाऱ्याच्या गलथान कारभारामुळे अहवालामध्ये यांचा समावेश करण्यात आलेला नाही. शेती पिकासोबतच अनेकांच्या फळबागा अक्षरशः मोडून गेल्या आहेत. टरबुज, आंबा, चिंच, चिकू मोसंबी, लिंबू, केळी व पपई या फळबागा चे अतोनात नुकसान झालेले आहे. अनेकांच्या फळबागा उद्धस्त झालेले आहेत, तरीही आणि गावांमध्ये अतिवृष्टी न झाल्याचा अहवाल प्रशासनाने दिलेला आहे. अनेक गावे या अतिवृष्टीच्या नुकसानातून वगळली जाणार आहेत म्हणून ज्या काही गावांचे नुकसान झालेला आहे. त्या गावांना पुन्हा नोंदी करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यात यावा अशी मागणी उपजिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने करण्यात आली. यावेळी शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे , राजेंद्र वीर, सामाजिक कार्यकर्ते सुंदरराव चव्हाण, बालाजी पवार ,कैलास थोटे, सचिन काळे, कैलासराव वाघ, आदींच्या वतीने निवेदन देण्यात आले.



## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती एम एस पठारे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज ५६६/२०२६**
**शुभांगी जयेंद्रकुमार काळे व इतर विरुध्द निरंक**

अर्जदार :– **१. शुभांगी जयेंद्रकुमार काळे, वय–४६ वर्षे, धंदा–घरकाम, रा. सहयोगनगर, जालना रोड, बीड, ता. जि. बीड. २. स्वरुपा जयेंद्रकुमार काळे, वय–२६, वर्षे, धंदा–घरकाम, रा. सहयोगनगर, जालना रोड, बीड, ता. जि. बीड. ३. यश जयेंद्रकुमार काळे, वय–२२ वर्षे, धंदा–शिक्षण, रा. सहयोगनगर, जालना रोड, बीड, ता. जि. बीड. ४. सुलोचना भ्र. सखाहरी काळे, वय–८२ वर्षे, धंदा–घरकाम, रा. सहयोगनगर, जालना रोड, बीड, ता. जि. बीड**

विरुध्द

गैरअर्जदार :– निरंक

(अर्जदार हे भारतीय आहेत)

मागणी अर्ज :– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत जयेंद्रकुमार सखाहरी काळे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी **मयत जयेंद्रकुमार सखाहरी काळे यांचा मृत्यु दिनांक ०२.०३.२०२६ रोजी सहयोगनगर बीड, ता. जि. बीड** येथे मयत झाले असुन अर्जदार क.१ ही मयताची पत्नी आहे. अर्जदार क्र. २ ही मयताची मुलगी तर अर्जदार के ३ हा मयताचा मुलगा आहे अर्जदार क ४ ही मयताची आई आहे. हे मयताचे कायदेशीर वारस आहे.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत जयेंद्रकुमार सखाहरी काळे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०८ एप्रिल २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०९ जुन २०२६**
**(अॅड. राम ज. दहिवाळ)**

**शिक्का**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

**आदेशावरून**
**(स्वाक्षरीत)**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**



# सामाजिक समता सप्ताहाची दमदार सुरुवात

## महापुरुषांच्या विचारांची बांधिलकी जपण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

**धाराशिव । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त ८ एप्रिल ते १४ एप्रिल २०२६ या कालावधीत जिल्ह्यात सामाजिक समता सप्ताह विविध उपक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे.या सप्ताहाच्या निमित्ताने शासकीयस्तरावर जनजागृतीपर कार्यक्रम,शिबिरे व विशेष उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहाचे आज ८ एप्रिल रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन सभागृहात जिल्हाधिकारी किर्ती किरण पूजार यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले.यावेळी



जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती.प्रियंवदा म्हाडदळकर,जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे उपायुक्त बलभीम शिंदे,जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश काळे,समाज कल्याणचे सहायक आयुक्त सचिन कवले, समाज कल्याण अधिकारी सनम लामकाने,इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक अमोल ताकभाते यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. जिल्हाधिकारी किर्ती किरण पूजार यांनी यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की,महापुरुषांच्या विचारांची बांधिलकी जपणे व पुढे नेण्याची जबाबदारी सर्वांची आहे. त्यांनी भारतीय संविधान निर्मितीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे अमूल्य योगदान आणि मूलभूत हक्कांविषयी विस्तृत माहिती दिली. तसेच डॉ.आंबेडकर यांनी केलेल्या विविध चळवळी व सत्याग्रहांची माहिती देत सामाजिक समता सप्ताहाचे महत्त्व पटवून दिले.

# पैठण तालुक्याचे विविध विकास कामाचा आढावा

## सर्वसामान्यांच्या तक्रारी निवारणाबरोबरच विविध विकास योजनांची प्रभावी अंमलबजावणी करा: जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी.

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

दि.८ (जिमाका). सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारी निवारण करण्याबरोबर आवास , शेत रस्ते, कृषी, पाणीपुरवठाया पायाभूत विकास योजनाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी यांनी आज येथे दिले

पैठण तहसील कार्यालयामध्ये आढावा तालुकास्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम ,उपविभागीय अधिकारी नीलम बाफना, जिल्हा परिषदेचे



उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रहार ढोकणे, तहसीलदार ज्योती पवार, गटविकास अधिकारी अनुपमा गायकवाड, नगरपालिका मुख्याधिकारी पल्लवी अंभोरे, पोलीस निरीक्षक विकास पाटील, तालुका कृषी अधिकारी बळीराम राठोड, विस्तार अधिकारी मनोज चव्हाण गटशिक्षण अधिकारी यांच्यासह सर्व तालुकास्तरीय अधिकारी, तलाठी, ग्रामविकास अधिकारी, मंडळ अधिकारी यांची उपस्थिती होती.

आवास योजनेतील घरकुलांसाठी मोफत वाळू वाटप, लोकशाही दिनातील प्रलंबित अर्ज व त्याचा संबंधित विभागाला निकाली काढण्यासाठी पाठपुरावा करावा.मतदार यादी मॅपिंगचे काम , जनगणना कामाच्या संदर्भातील प्रशिक्षण, कृषी लागवडीखालील क्षेत्राच्या सिंचन सुविधा व पीक प्रकार याबाबत आढावा घेण्यात आला.

# शेख रुकसार युनुसची पोलिस दलात भरारी;

## सामाजिक चळवळीतील सहकाऱ्यांकडून गौरव : डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र पोलीस भरती प्रक्रियेत बीड तालुक्यातील च–हाटा येथील सामाजिक चळवळीतील सहकारी शेख युनुस च–हाटकर यांची मुलगी शेख रूक्सार युनुस हिची पुणे शहर पोलिस दलात निवड झाल्याबद्दल बीड येथील शासकीय विश्रामगृहात बुधवारी (दि.०८) सामाजिक चळवळीतील सहका–यांच्या वतीने सहकुटुंब तिचा व कुटुंबियांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन हृद्य सत्कार करण्यात आला. बीड शहराजवळील च–हाटा गावातील सर्वसामान्य कुटुंबातील रूक्सार हिने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर हे यश संपादन केले. शारीरिक तंदुरुस्ती, नियमित



अभ्यास तसेच लेखी परीक्षेची काटेकोर तयारी करत तिने पोलीस भरती प्रक्रियेतील सर्व टप्प्यांवर यशस्वीपणे मात केली. तिच्या या यशामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरांतून तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

ग्रामीण भागातील मुलींसाठी प्रेरणादायी यश – डॉ. गणेश ढवळे– यावेळी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, शेख रूक्सार हिने शारीरिक चाचण्या, लेखी परीक्षा आणि मुलाखती अशा सर्व टप्प्यांवर यशस्वी वाटचाल करून ग्रामीण भागातील मुलींसाठी एक आदर्श निर्माण केला आहे. जिद्द, सातत्य आणि मेहनतीच्या बळावर कोणतेही ध्येय गाठता येते, हे तिच्या यशातून स्पष्ट झाले आहे. तिच्या या यशाचा आम्हाला अभिमान आहे. तसेच, सामाजिक चळवळीतील सहका–याची लेक असल्याने ती सर्वसामान्यांच्या समस्या जाणून घेत कर्तव्य पार पाडेल, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

कुटुंबियांची साथ लाख मोलाची – शेख रूक्सार युनुस

सत्कारमूर्ती शेख रूक्सार युनुस हिने आपल्या यशाचे श्रेय कुटुंबातील सदस्यांना देत त्यांच्या मोलाच्या साथीमुळे हे यश मिळाल्याचे सांगितले. भविष्यात सामाजिक चळवळीतील सहका–यांनी व्यक्त केलेल्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील राहण्याची ग्वाहीही तिने दिली. यावेळी शेख युनुस यांनी मुलीच्या सत्काराबद्दल सर्वांचे आभार मानले.

कार्यक्रमात बाळासाहेब मोरे पाटील (प्रदेशाध्यक्ष, शिवशक्ती–भिमशक्ती विचारमंच, महाराष्ट्र राज्य), माजी सैनिक अशोक येडे (जिल्हाध्यक्ष, आम आदमी पार्टी, बीड), रामधन जमाले (जिल्हाध्यक्ष, इंटक), प्राचार्य डी. जी. तांदळे (अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य किसानसभा, बीड जिल्हा), नितीन सोनावणे (जिल्हाध्यक्ष, ऑल इंडिया पँथर सेना), किष्किंधा पांचाळ (अध्यक्ष, विश्व कल्याण महिला सेवा भावी संस्था, बीड), आम्रपाली साबळे (मराठवाडा उपाध्यक्ष, अन्याय–अत्याचार–भ्रष्टाचार विरोधी समिती, महाराष्ट्र राज्य), सिताबाई भोसले (महिला जिल्हाध्यक्ष, रिपब्लिकन पार्टी) यांसह मान्यवरांनी रूक्सारच्या यशाचे कौतुक करत शुभेच्छा दिल्या.यावेळी माहिती अधिकार कार्यकर्ते शेख मुबीन, पांडुरंग हराळे, धनंजय सानप, विनेश उबाळे (सरपंच, च–हाटा), रफीक पठाण (जिल्हा उपाध्यक्ष, आम आदमी पार्टी, बीड), हनुमान घोडके, सूर्यकांत ठोकळ (जिल्हा सल्लागार, ऑल इंडिया पँथर सेना, बीड), राजू वाघमारे आदी सामाजिक कार्यकर्ते, मित्रपरिवार तसेच शेख रूक्सार युनुस हिचे नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● गुरूवार दि. ०९ एप्रिल २०२६ ●

## थोडक्यात...

### वाढदिवसाला बोलवले नाही म्हणून तरुणाची आत्महत्या



● माझं दुःख कोणाला सांगू मी एकटा पडलो असे स्टेटस मोबाईलवर ठेवून तरुणाची आत्महत्या

**बीड । प्रतिनिधी**

अबाजोगाई तालुक्यातील कुंबेफळ येथे किरकोळ कारणातून निर्माण झालेल्या मानसिक तणावामुळे एका तरुणाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे. मित्रांनी वाढदिवसाच्या कार्यक्रमाला निमंत्रण न दिल्यामुळे मनाला लागलेल्या वेदनेतून २४ वर्षीय महेश उद्धव भणगे याने टोकाचे पाऊल उचलल्याची माहिती मिळत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी दुपारच्या सुमारास महेश घराच्या छतावर गंभीर अवस्थेत आढळून आला. त्यानंतर कुटुंबीयांनी तातडीने त्याला स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. काही दिवसांपूर्वी महेशचा मित्रांसोबत वाद झाला होता. त्यानंतर झालेल्या एका वाढदिवस समारंभाला त्याला बोलावण्यात आले नव्हते. या घटनेचा त्याच्या मनावर परिणाम झाल्याचे सांगितले जात आहे. घटनेपूर्वी त्याने मोबाईलवर एकटेपणाची भावना व्यक्त करणारा संदेश ठेवला होता. महेशच्या वडिलांनी शेती विकून त्याच्यासाठी कपड्याचे दुकान सुरू करून दिले होते. मात्र अचानक घडलेल्या या घटनेमुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या प्रकरणाचा पुढील तपास अंबाजोगाई ग्रामीण पोलीस करत आहेत.

# छत्रपती संभाजी महाराज यांच्या स्मारकासाठी आ. संदीप क्षीरसागर आग्रही

## बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसलेंची भेट घेऊन निवेदन दिले

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील बायपासवर म्हणजेच महालक्ष्मी चौक येथे असलेला छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा अस्तित्वात आहे. परंतु छत्रपती संभाजीनगर येथील क्रांतीचौकाच्या धर्तीवर बीडमध्ये छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक व्हावे यासाठी आ. संदीप क्षीरसागर आग्रही असून, यासाठी त्यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची बुधवारी (दि.८) सकाळी भेट घेऊन याबाबत सविस्तर चर्चा केली आणि



निवेदन दिले आहे.

बीड शहरातून जाणारा सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्ग आहे. शहरात वाहनांची वर्दळ वाढू नये म्हणून खजाना बावडी ते रामनगर असा बायपास रस्ता करण्यात आला आहे. परंतु या बयपासवर शहरात प्रवेश करण्यासाठी असलेल्या दोन्ही ठिकाणी उड्डाणपूल नसल्याने नियमित अपघाताच्या घटना घडत होत्या. तसेच काही ठिकाणी स्लीप रोड नसल्याने प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. या अपघात आणि त्रासातून सुटका व्हावी म्हणून आ. संदीप क्षीरसागर प्रयत्नशील होते. यासाठी शहरात प्रवेश करण्याच्या दोन्ही ठिकाणी उड्डाणपूल आणि आवश्यक ठिकाणी स्लीप रोडसाठी त्यांचा पाठपुरावा सुरू होता. यासाठी त्यांनी शासन, प्रशासन आणि आ. संदीप क्षीरसागर व माजी आ. सय्यद सलीम यांनी यांनी औरंगाबाद उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या त्यांच्या पाठपुराव्याला यश आले असून दोन्ही ठिकाणी उड्डाणपूल आणि स्लीप रोडचे काम सध्या सुरू आहे. त्यानंतर आता आ. संदीप क्षीरसागर यांनी बायपासवर महालक्ष्मी चौकात छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्याची उंची वाढवून सुसज्ज स्मारक व्हावे अशी मागणी केली आहे. यापूर्वी आ.क्षीरसागर यांनी याबाबत अर्थसंकल्पीय अधिवेशनात मागणी केली होती. त्यानंतर आता सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची प्रत्यक्ष भेट घेऊन बीड शहराच्या बायपास रस्त्यावरील छत्रपती संभाजी महाराज यांचे स्मारक उभारण्यात यावे यासाठी सविस्तर निवेदन सादर केले. याबाबत सविस्तर माहिती दिली. लवकरच याबाबत बैठक घेऊन सकारात्मक निर्णय घेणार असल्याचे मंत्री महोदयांनी सांगितले. हे स्मारक झाले तर बीड शहराच्या वैभवात मोठी भर पडणार आहे.

# महात्मा फुले आणि डॉ. आंबेडकर जयंती सणाच्या निमित्ताने सर्व शिक्षकांचे वेतन 10 एप्रिल पर्यंत खात्यात जमा करा

## विनाअनुदानित शाळा कृती समितीचे शिक्षणाधिकारी पाटील मॅडम यांना निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती सणाच्या निमित्ताने बीड जिल्ह्यातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मार्च -२०२६ चे वेतन १० एप्रिल पर्यंत त्यांच्या खात्यात जमा करावे अशी मागणी 'बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समिती'च्या वतीने बीड शिक्षणाधिकारी पाटील मॅडम यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली. क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न



डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती सण तोंडावर आलेला असताना बीड जिल्ह्यातील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे मार्च महिन्याचे वेतन त्यांच्या खात्यात अद्याप जमा झालेले नाही. त्यामुळे जिल्ह्यातील शिक्षकांना फुले आंबेडकर जयंती सण कसा साजरा करावा याचा प्रश्न निर्माण झाला आहे. ऐन सणासुदीच्या काळात ही समस्या अधिक गंभीर ठरत आहे. या जयंती सणाच्या पार्श्वभूमीवर शिक्षण विभागाने सहानुभूतीपूर्वक विचार करून जिल्ह्यातील शिक्षकांचे मार्च -२०२६ चे वेतन जयंतीपूर्वी, म्हणजेच १० एप्रिलपर्यंत त्यांच्या बँक खात्यात जमा करावे, अशी मागणी निवेदनाद्वारे केली. यावेळी शिक्षणाधिकारी श्रीमती पाटील मॅडम यांनी विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली. यावेळी बोलताना त्यांनी संच मान्यता आणि शिक्षक समायोजनाचा प्रश्न मार्गी लागण्याची प्रकिया सुरू आहे. सदरील प्रक्रिया १० एप्रिल पर्यंत पूर्ण होईल. ही प्रक्रिया पूर्ण होताच सर्व शिक्षकांच्या खात्यावर वेतन जमा करणार असल्याचे सांगितले. या निवेदनावर जितेंद्र डोंगरे, आत्माराम वाव्हळ, तुकाराम खाडे, प्रा. सोनवणे, अशोक मोरे, सुभाष मोरे, अभिमन्यू बोरखेडे, शिवप्रसाद सिरसाट, प्रा. ढास आणि प्रा. मस्के आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# मंजरथ येथे भव्य खुल्या कबड्डी स्पर्धेचे आयोजन : सचिन पाडमुख

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील मंजरथ येथे मंजरथ वॉरियर्स क्रीडा मंडळाच्या वतीने भव्य खुल्या कबड्डी स्पर्धेचे आयोजन रविवार, दि. १२ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी बीड जिल्हा परिषद बांधकाम व अर्थ सभापती मा. जयसिंग भैया सोळंके हे असणार आहेत. उद्घाटक म्हणून तुळजाभवानी बँकेचे चेअरमन मा. चंद्रकांतजी शेजुळ उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून रिपब्लिकन सेना महाराष्ट्र राज्याचे नेते मा. विजयदादा साळवे तसेच महाराष्ट्र कबड्डी असोसिएशनचे कोषाध्यक्ष मा. मंगलजी पांडे सर उपस्थित राहणार आहेत. यावेळी माजलगाव खरेदी-विक्री महासंघाचे उपाध्यक्ष भालचंद्र पाठक (मंजरथकर) यांचीही प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तसेच मंजरथ गावचे सरपंच भागवत पोहेकर व उपसरपंच काशिनाथ आळसे हे देखील कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत.



स्पर्धेसाठी आकर्षक बक्षिसांची घोषणा करण्यात आली असून, प्रथम बक्षीस रुपये २५,५५५ हे मा. जयसिंग भैया सोळंके यांच्या वतीने ठेवण्यात आले आहे. द्वितीय बक्षीस रुपये १५,५५५ हे माजी पंचायत समिती सदस्य मा. दीपक भाऊ साळवे यांच्या वतीने देण्यात येणार आहे. तृतीय बक्षीस रुपये ११,१११ हे माजी सरपंच तुकाराम चोरमले यांच्या वतीने, तर चतुर्थ बक्षीस रुपये ७,७७७ हे सेवा सोसायटीचे चेअरमन दत्ता आस्वले यांच्या वतीने ठेवण्यात आले आहे. याशिवाय उत्कृष्ट चढाईसाठी रुपये ३,३३३ हे माजी उपसरपंच मा. निवृत्ती खरात यांच्या वतीने, तसेच उत्कृष्ट पकडीसाठी रुपये ३,३३३ हे माजी ग्रामपंचायत सदस्य मा. मारुती काळे यांच्या वतीने देण्यात येणार आहेत. या भव्य स्पर्धेत जास्तीत जास्त कबड्डी संघांनी सहभागी व्हावे, असे आवाहन मंजरथ वॉरियर्स क्रीडा मंडळाचे अध्यक्ष सचिन पाडमुख यांनी केले आहे.

## 'सहाल चाऊस, नगरसेवकांचा सन्मान करा'

# दर्जा हिन कामे करणाऱ्या एजंसी ला काम कशासाठी?- बाबुराव पोटभरे



### मीच सहाल चाऊस यांना उपाध्यक्षपदासाठी विरोध केला होता

**भुमीपुजन कार्यक्रमाला विशेष उपस्थिती म्हणुन राष्ट्रवादी कॉँग्रेस तुतारी चे माजलगाव मतदार संघाचे नेते मोहनराव जगताप यांचे नाव निमंत्रण पत्रिकेवर होते पण ते उपस्थित राहिले नाहीत. यासाठी सदर प्रतिनिधीने त्यांना मोबाइलद्वारे संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की,मला बोलण्यासाठी सहाल चाऊस आले नाहीत आणि आ.दादा माझे नाव न घेता म्हणाले असतील की, एका बड्या नेत्याने विरोध केला होता तर होय मीच सहाल चाऊस यांना उपाध्यक्षपदासाठी विरोध केला होता.**

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील नगर परिषदेच्या अध्यक्षा सहाल चाऊस यांच्या सुन असल्या तरी प्रत्यक्षात उपाध्यक्ष सहाल चाऊस हेच नगरपरिषदेचा कारभार करत असल्याचे स्पष्ट झाल्याने बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांनी त्यांनाच केंद्रबिंदू मानून जाहीरपणे म्हणाले की,सहाल भैय्या नगरसेवकांना नगरसेवकांचा सन्मान करा,सत्तेचा गैरफायदा घेऊ नका, दर्जा हिन कामे करणाऱ्या एजंसी ला काम कशासाठी दिले असे प्रखड मत पोटभरे यांनी व्यक्त केले आहे. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत ९८कोटी ,७७लाख रुपये खर्चाच्या माजलगाव पाणी पुरवठा योजना जलशुद्धीकरण केंद्र व सलोह जलकुंभ भुमीपुजन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थीय समारोपात बाबुराव पोटभरे म्हणाले की,सहाल चाऊस यांच्या मैत्री पोटी न.प.निवडणुकीत आ.प्रकाशदादा सोळंके यांच्या विरोधात सहाल चाऊस यांची सुन,व त्यांच्या बाजूने काम केले होते पण सहाल भैय्या नगरसेवकांना नगरसेवकांचा सन्मान करीत नाहीत असे वास्तव समोर आले आहे.

ज्या एजंसी ला काम देण्यात आले त्या संतोष इंफ्रास्ट्रकर कंपनीने बीड जिल्ह्यातील पाटोदा,शिरुरकासार येथे केलेली कामे निकृष्ट दर्जाची केली होती पण त्याच गुत्तेदाराला माजलगाव शहरातील काम कदाचित टेंडर मॅनेज करून दिले असल्याचा संशय व्यक्त करुन पोटभरे म्हणाले की, कशासाठी दिले असा प्रश्न विचारला आहे. भुमीपुजनाचे उद्घाटक म्हणून आमदार प्रकाशदादा सोळंके म्हणाले की, माजलगाव शहरातील विकास कामांसाठी निधी कमी नाही तर काम करणाऱ्यांची कमी आहे म्हणत सदरची नियोजित योजना ११महिण्यात पुर्ण करण्यासाठी नगरसेवक व विशेषतः सहाल चाऊस यांनी तत्परता दाखवली पाहिजे. सहाल चाऊस यांना उपाध्यक्ष करण्यासाठी त्यांच्याच एका बड्या राजकीय नेत्याचा विरोध होता पण राष्ट्रवादी काँग्रेस घड्याळ च्या उमेदवारा विरोधात मतदारांनी चाऊस यांना अध्यक्षपदासाठी निवडुण दिले होते म्हणुन मी सहाल चाऊस यांना उपाध्यक्ष करण्यासाठी पाठींबा दिला. पोटभरे सहाल चाऊस यांच्या बोलत असताना मध्येच माजी आमदार डि.के. देशमुख म्हणाले की, आमच्या सोबत चाऊस चांगले वागतात यावर पोटभरे म्हणाले, तुमच्या, आमच्या सोबत चाऊस चांगले वागतात पण सामान्य नागरिक, नगरसेवकांचा सन्मान करीत नाहीत याचे उदाहरण म्हणजे एका नगरसेवकाने त्यांना प्रभागातील कामा साठी फोन केला होता तर भैय्या त्याला म्हणाले होते चल ठेव फोन,यावर सर्वच मान्यवर निरुत्तर झाल्याचे दिसून आले.

# पावसाळ्यापूर्वी नाल्याचे काम पूर्ण करण्यासाठी मुख्याधिकारी यांच्याकडे नगरसेवक शिराळे यांची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील बार्शी रोडवरील जिजाऊ नगर, धांडे नगर ,वार्ड क्रमांक- २५ येथील होणाऱ्या मुख्य नालाकाम व नाला कामा शेजारी उर्वरित सिमेंट कॉंक्रीट रस्ता तसेच सोमेश्वर नगर येथील सिमेंट कॉंक्रीट रस्ता व नाला काम पावसाळ्यापूर्वी तात्काळ करून घ्यावे यासंबंधी मुख्य अधिकारी नगर परिषद बीड यांना निवेदन देताना भाजपा गटनेत्या सारिका ताई शिरसागर, नगरसेवक अॅड. गोविंद शिराळे पाटील, नगरसेवक सनीजी माने, तसेच नाला बांधकाम



लवकरात लवकर पावसाळ्यापूर्वी उच्चतम कॉलिटी चे साहित्य तसेच उच्चतम बांधकाम रस्ता करावे , दराच्या दररोज बांधकामावरती पाणी मारावे म्हणजेच बांधकाम चांगले पक्के होईल, जिजाऊ नगर कडे जाणारा नालापूल लवकरात लवकर तयार करावा जेणेकरून जिजाऊ नगर कडे येणाऱ्या नागरिकांना त्रास होणार नाही अशा संबंधित कामाची पाहणी करून गुत्तेदारांना व संबंधित इंजिनिअर यांना सूचना करताना नगरसेवक अॅड. गोविंद शिराळे हे दिसत आहेत.

# दर्शनादरम्यान दागिन्यांची चोरी उघड; महिला ताब्यात

## १.७० लाखांचा मुद्देमाल जप्त; बीड स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**बीड । प्रतिनिधी**

रामगडावर दर्शनासाठी आलेल्या एका वृद्ध महिलेच्या गळ्यातील सुमारे १ लाख ७० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने चोरीस गेल्याच्या घटनेचा स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांनी यशस्वी छडा लावत महिला आरोपीला अटक केली असून चोरीचा संपूर्ण मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. दि. २६ मार्च २०२६ रोजी फिर्यादी सोनाबाई रतन वैद्य (वय ७५, रा. घोसापुरी, ता.जि. बीड) या रामगड येथे दर्शनासाठी गेल्या असता गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने त्यांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने लंपास केले होते.



याप्रकरणी बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ९९/२०२६ कलम ३०३(२) बीएनएस अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. दरम्यान, या गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडून समांतरपणे सुरू असताना पोलीस निरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि जारवाल, पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर व त्यांच्या पथकाने गुप्त माहितीच्या आधारे सापळा रचला. या कारवाईत दुर्पदाबाई परमेश्वर जाधव (रा. गांधीनगर पेठ, बीड) हिला ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान आरोपी महिलेने गुन्ह्याची कबुली दिल्यानंतर तिच्याकडून चोरीस गेलेले १ लाख ७० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले. पुढील तपासासाठी आरोपीस बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, सपोनि जारवाल, पोउनि श्रीराम खटावकर तसेच पोलीस हवालदार सोमनाथ गायकवाड, आनंद मस्के, बाळु सानप, स्वाती मुंडे, मनोज परजणे, अश्फाक सय्यद व सिद्धेश्वर मांजरे यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.